—/

जबाब. दिनांक १३/११/२०२०

श्रीमती.शरमिन शाहरूख शेख, वय २१वर्ष,धंदा –घरकाम( शाळेची मुले ने–आण करणे ) राठी. रूम नं७९९ चाळ नं ५८,भारत नगर,बीकेसी,मुंबई ४०००५१. मो.नं.९१३७३४५७०५

---------

मी, वरिलप्रमाणे असून,नमूद पत्यावर माझ्या कुटुंबीयासह राहत आहे. त्यामध्ये माझे वडील नामे फरीद शेख वय–५८ वर्षे,आई नामे जरीना शेख,व भाउ नामे नवाज शेख वय–१४ वर्षे यांच्यासह रहात आहे. माझे शिक्षण इयत्ता बारावी पर्यंत खेरवांडी येथील कॉर्डीनल ग्रसिस शाळेमध्ये झालेले आहे.

माझा सन २०१६ मध्ये इसम नामे शाहरूख शेख,वय ३० वर्षे, राठी. रूम नं ८९८, चाळ नं ५८, भारत नगर,बीकेसी, मुंबई ४०० ०५१. यांच्याशी विवाह झाला असुन २०१७ मध्ये माझे .पतीने मला मारहाण केले होती त्यामुळे मी पती विरूध्द बीकेसी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला होता. तसेच मी माझे पती शाहरूख शेख व त्यांच्या कुटुंबियांच्या विरूध्द कैटुबिक हिसांचार कायदयान्वये गुन्हा दाखल केला आहे. तेव्हापासुन मी माझे वडींला सोबत राहवयास आहे.

मी दिनांक. २७/१०/२० रोजी बीकेसी पोलीस ठाण्यास १. [redacted] २.जलील शेख ३. [redacted] यांच्या विरोधात तक्रारी अर्ज वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बी.के.सी. पोलीस ठाणे यांचेकडे तक्रार अर्ज केला होता . सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने, चौकशी अधिकारी पो.नि.मोरे यांनी मला संपर्क साधून बी.के.सी. पोलीस ठाणे येथे समक्ष हजर राहण्याबाबत कळविल्याने, मी आज दिनांक –१३/११/२०२०. रोजी माझा मानलेला भाउ बद्रदीन मानियार यांचे सोबत हजर झाले पोलीसांनी मला माझा तक्रारी अर्ज दाखविला तो मी पाहीला त्यावर माझीच स्वाक्षरी आहे सदर तक्रार अर्जासंबधी माझेम्हणणे असे की,

मी सन २०१८ पासून मनियार कुटुंबातील लहान मुलांना खेरवाडी येथील शाळेमध्ये सोडण्याचे काम करत होते. परंतु सदरचे काम लॉकडाउन मुळे बंद आहे. त्यामुळे मी सध्या घरीच असते. सन २०२० मध्ये मनियार कुटुंबाच्या विरोधात बीकेसी पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.क्र. १८०/२० कलम– ३०७,३२४ भादवि या गुन्हयातील आरोपीत बद्रदीन मनियार,रमजान मनियार,नासिर मनियार व इतर हे अंतरीम जामीनावर बाहेर आल्यानंतर ऑगस्ट २०२० च्या सुरूवातीस [redacted] याने मला भेटुन सालेम कुरेशी याने मनियार कुटुबियावर खोटी गुन्हे दाखल करण्यासाठी रूपये ५० हजार रूपये, किराणा माल पथ्तरनगर येथील इमारती मध्ये घर, तसेच मला लागणाऱ्या दैनंदीन वस्तु देण्याचे ऑफर दिल्याचे सांगितेले त्यावर मी त्यास नकार दिला होता.

मी त्यास नकार दिल्यामुळे इसम नामे १. [redacted] २.जलील शेख ३. [redacted] यांनी मला धमकी देण्यास सुरूवात केली तसेच माझ्या विरोधात खोटे अदखलपात्र गुन्हे दाखल केले. तसेच मला गु.र.क्र. १८०/२० कलम– ३०७,३२४ भादवि या गुन्हयात अडकविण्याची धमकी दिली. मी त्यास माझी चुक नसतांना मला का अडकावता अशी [redacted] यास विनंती केली असता त्यानी मला " जितने गऐ

आऐ वो सब बेगुन्हा है कसुरवार कोण है, इतनो का नाम आए तो तेरा भी डाल सकते है'' असे सांगितले.

तद्नंतर ऑगस्ट—२०२० मी सदर परिसरातुन जात असताना दोन ते तीन वेळा [redacted] यांनी मला त्यांचे पोलीसांबरोबरचे फोटो दाखवुन धमकी दिली होती.तसेच त्यांनी मला बीकेसी पोलीस ठाण्याचे शिंदे व कोळे साहेब यांना सागूनं तुला खोटया गुन्हयात अडकवण्यात येईल. अशी धमकी दिली होती. [redacted] व त्याचे साथीदार हे ज्यावेळी मी त्यांना दिसत असे त्यावेळी ते मला शिवीगाळ करत असत.

माझे मानलेले काका नामे समीर ( पुर्ण नाव माहीत नाही )यांचे नागोरी हॉटेल,च्या गल्ली,भारत नगर येथील कार्यालयात आधार कार्ड ,पॅनकार्ड बनवुन देण्याचा व्यवसाय आहे. ऑगस्ट २०२० मध्ये मी सदर कार्यालयाच्या बाहेर कपडे विक्री करण्याचा व्यवसाय करत असे, त्यावेळी [redacted] हे मला मनियार कुटुंबांच्या विरूध्द तुला रेपची केस दाखल करावी लागेल. असे मला बोलले होते व नाही केले तर मला मनियार कुटुबांच्या विरूध्द दाखल असलेल्या केस मध्ये अडकविण्याची धमकी दिली होती. मी त्यांचे म्हणणे ऐकले नाही म्हणुन [redacted] यांनी माझे पती नामे शारिक शेख यास पैसे व लालच दाखवुन माझे विरूध्दात अदखलपात्र गुन्हा नोंद करावयास लावला आहे.

ऑगस्ट—२०२०मध्ये मी रस्त्याने जात असताना [redacted] व त्यांचे साथीदार जलील शेख,[redacted]यांनी दोन ते तीन वेळा मला नगर सेवक सालेम कुरेशी यांनी ऑफिस वर भेटायला बोलावले आहे असे सांगुन मी भेटायला न गेल्यास माझा तडीपारचा बॉन्ड काढतील असे धमकावले होते . मात्र मी त्यांना भेटण्यास गेले नाही.

तद्नंतर दोन ते तीन दिवसानंतर मी माझे माझे घराकडुन माझे आजीच्या घराकडे जात असताना प्लॉट नं.११ च्या येथे [redacted] व [redacted] मला भेटले व त्यांनी मला '' थोडे पुढे चल मला बोलायचे आहे,असे बोलले व त्याच्या सोबत पुढे गेल्यानंतर त्यांनी मला एका कारमध्ये बसण्यास सांगितले व'' चल तूझे हमारी पेहेचान देखाते है असे बोलले व त्यांनी मला जबरदस्ती कारमध्ये बसवले व माझा मोबाईल हातातुन काढुन घेतला ''त्यावेळी त्या मो/कारमध्ये [redacted], [redacted] व जलील मुल्ला हे होते ते मला कांदीवली क्राईम ब्रन्च कार्यालय येथे घेवुन गेले व तेथे मला कार्यालया बाहेर बसवुन ते कॅबिन मध्ये गेले.

त्यानंतर [redacted] हे मला केबिनमध्ये घेवुन गेले सदर ठिकाणी एक पोलीस अधिकारी युनिफार्म बसले होते त्यावेळी [redacted] यांनी अधिकाऱ्यास मनियार कुटुंबियाचे फोटो दाखवुन बद्रदीन मनियार यांचे इनकाउंटर बाबत बोलत होते व पैसे देण्याबाबत बोलत होते. त्यानंतर .केबिन बाहेर आल्यानंतर [redacted] जलील शेख,[redacted] या तिघांनी मला ''तु देख मेरी पेहेचान कितनी है, सोच तेरा क्या कर सकते है, अभी भी तेरे पास वक्त है '' असे बोलले. त्यांनतर मला ज्याठिकाणावरून गाडीत बसवण्यात आले होते त्याठिकाणी त्यांनी मला आणुन सोडले

समक्ष
13.11.20
पोलीस निरीक्षक
बी.के.सी. पो.ठाणे मुंबई

081268

13/11/2020

**श्रीमती.शरमिन शाहरूख शेख, वय २१वर्ष याचा दि.१३/११/२०रोजी नोंदविलेला जबाब पुढे सतत.**

त्यानंतर मी सदर घटनेबाबत माझे आईला सांगितले असता,आईने मला सांगितले कि, फालतु काम आपण करत नाही,तु हिमंत ठेव असे सांगितले होते.

तद्नंतर दुसरे दिवशी माझे पती नामे शाहरूख शेख यांनी मला मनियार यांच्या विरूध्दात साक्ष देण्यास तयार आहे का? असे विचारणा केली असता मी त्यास नकार दिला त्यावर माझे पती यांनी मला अख्तर [redacted],जलील शेख,[redacted], सालेम कुरेशी,जलील शेख ,[redacted],अन्नु शेख,फिरोज बॉस,[redacted], सुलेमान खैराणी. याचे नाव घेवुन देख ये तेरे साथ क्या करते है. असे बोलुन मला धमकावले.

त्यांनतर मी ज्या ज्यावेळी वर नमुद इसमांच्या समोर जात असे त्यावेळी ते मला रंडी असे बोलुन शिवीगाळ करत असत, ते मला '' इधर से तु भाग जा,तुझे किधर भी फसवा देगे,भाडे का घर खाली करवा देंगे, रात मे पोलीस से उठवा लेंगे '' असे धमकावुन मला मानसिक त्रास देत होते त्यामुळे माझे घर सोडुन सप्टेंबर महिण्याच्या सुरूवातीस मी ऐकटी नालासोपारा (प),पालघर येथे राहवयास गेले होते.

ऑक्टोबर २०२० मध्ये बीकेसी पोलीस ठाण्यास नोंद गुन्हयात बद्रदीन मनियार व नासिर मनियार व इतर यांना जामीन मंजुर झाल्यानंतर माझे आईने मला त्यांना जामीन मंजुर झाल्याचे मला फोन करून कळविले तसेच आईने मला तु किती दिवस बाहेर राहणार तु घरी परत ये असे सांगितले त्यानंतर मी त्याचा जामिन मंजुर झाल्याची खात्री केली व मी भारत नगर,येथील माझे घरी परत आले.

मी ज्या--ज्यावेळी [redacted] व त्यांचे साथीदारांना दिसत असे त्यावेळी ते मला हे शिवीगाळ करत असत. तसेच आक्टोंबर--२०२० मध्ये [redacted] यांनी माझे मामा नामे आनसर शेख यांच्या घरी जावुन '' तुमरी भांजी जेल मे थी ,वापस जेल जाऐगी, उसे समझाओ '' असे बोलल्याचे माझे मामा यांनी मला सांगितले होते.

तद्नंतर मी वरील घटना घडल्या संदर्भात ऑगस्ट २०२० मध्येच एक वेळा मी बीकेसी पोलीस ठाण्यास आले होते.त्यावेळी [redacted] ,फिरोज बॉस, हे पोलीस ठाण्यास हजर होते त्यावेळी त्यानी कोले साहेब यांना बोलावुन घेतले व कोले साहेब यांनी मला'' मी त्यांच्या विरूध्द तक्रार केली तर ते मला ३०७ मध्ये अडकवतील असे धमकावले होते त्यानंतर मी घरी निघुन गेले होते.

ऑगस्ट २०२० पासुन घडलेल्या घटना संदर्भात मी अपर पोलीस आयुक्त,बाद्रां पश्चिम मुंबई, वपोनि बीकेसी पोलीस ठाणे, येथे नोव्हेबर २०२०मध्ये तक्रारी अर्ज केले होते. त्यांनतर देखिल [redacted],[redacted], यांनी माझा भाउ नामे नवाज शेख वय १५ वर्ष यास '' तेरे बहिण ने जो अर्जी किया है वो वापस लेने कि लिए बोल. नही तो तुमारा जीना दुशवार कर देगे '' असे धमकावल्याचे माझा भाउ नवाज शेख यांनी मला सांगितले होते.

(क्र.मा.प.)

दिनांक १०/११/२०रोजी [redacted] याची पुतणी नामे [redacted] व [redacted] यांनी मला धक्का देवुन शिवीगाळ केली तसेच तिने मला तिचे काकांच्या विरूध्द जो अर्ज केला आहे तो परत न घेतल्यास '' तुझे नंगा करेगे '' असे धमकावले. त्यामुळे मी त्यांच्या विरूध्द बीकेसी पोलीस ठाण्यास अदखलपात्र गुन्हा नोंद केला.

तद्नंतर दिनांक १२/११/२० रोजी दुपारी ४.०० वा सुमारास मी माझे आजीच्या घरापासुन जात असताना [redacted] या कोणास तरी फोनवर सांगत होती की '' तुम जल्दी आओ ये इधर खडी है'' त्याच दिवशी संध्याकाळी मी माझे आजीच्या घराकडुन घरी येत असताना मटनाच्या घरासमोर [redacted] यांनी मला '' तु रूक मेरे भतीजी के खिलाफ एनसी करवा रही है, तेरे पिच्छे गुडें लगवाता हु '' असे बोलुन शिवीगाळ करून मला धमकाविले. त्यानंतर मी घरी येवुन फिनेल पित असताना माझे मानलेला भाउ नामे बद्रदीन मनियार हे आले व त्यांनी मला मारून समजावुन सांगितले की '' तु कुच्छ करेगे,तु उनका कुच्छ जाएगा क्या,हम लोगो का जाएगा'' असे बोलला. व त्यांनी मला वाचवले. या नंतर मला जे काही होईल त्यासाठी [redacted], जलील शेख , [redacted] ,सालेम कुरेशी,जलील शेख,[redacted],अन्नु शेख,फिरोज बॉस, [redacted], सुलेमान खैराणी. हे जबाबदार असतील.

ऑगस्ट माहिन्यामध्ये माझे सोबत घडलेल्या वर नमुद घटने पैकी काही घटनांचे मी माझे मोबाईल मध्ये ऑडीओ व व्हिडीओ रिकॉर्डीग केले आहेत. ते पोलीसांनाचौकशीकामी आवश्यक असतील त्यावेळी मी सादर करेन. तरी वर नमुद इसमांवर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा मानलेला भाउ बद्रदीन मनियार यांच्या समक्ष माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून. तो मला हिंदीतून समजावून सांगितला.तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

[signature] 13.11.20

( प्रदिप मोरे )

पोलीस निरीक्षक (गुन्हे)

बी.के.सी पोलीस ठाणे, मुंबई.

[signature] I.P. 13/11/2020

[signature] 081268 अनिता हिंगुजाले